REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

फ.मु. शिंदे यांच्या कवितेतील उपरोधिकता



प्रा.डॉ. रामलीला सुदामराव पवार
मराठी विभाग प्रमुख , कला महाविद्यालय, तीर्थपुरी.

प्रस्तावना :—

साठोत्तरी मराठी कवितेचे स्वरुप लक्षात घेता हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा आहे. मराठी कवितेच्या दृष्टीने हा कालखंड परिवर्तनशिल असून मराठी कवितेने नवविचारांच आणि वैज्ञानिक जाणिवांचा स्विकार याठिकाणी केलेला आढळतो. १९६० नंतरच्या साहित्याने वाङ्मयीन गुलामी नाकारली व मानवी जीवनमुल्यांचा स्वीकार केला. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता यांचा स्वतंत्रपणे पुरस्कार केला. या कवितेमध्ये परिवर्तनशिलता आणि प्रबोधन आहे.

मराठी कवितेचा कालखंड पाहता असे लक्षात येते की मराठीतील नवकाव्याची सुरुवात स्वातंत्र्यापूर्वी झालेली दिसते. बा.सि.मर्ढेकर, मुक्तिबोध, पु.शि.रेगे, य.द.भावे, ग्रामोपध्ये इत्यादीच्या कवितांचा विचार महत्त्वाचा ठरतो. नवकाव्याच्या दुसऱ्या टप्प्यात वि.दां करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, इंदिरा संत, त्र्य.वि.सरदेशमुख, वा.रा.कांत इत्यादी कविंचे लेखन महत्त्वाचे आहे. तिसऱ्या टप्यातील कवींमध्ये सदानंद रेगे, आरतीप्रभु, दि.पु. चित्रे, शांताबाई शेळके, सुरेश भट, पुरुषोत्तम पाटील, मधुकर केचे, श्रीधर शनवारे, इत्यादी कविंचा उल्लेख आहे. या सर्व कविंची रचना म्हणजे स्वतंत्र अभिव्यक्ति म्हणता येईल. मर्ढेकरांनी जीवनतील विसंगती, अर्थशून्यता, उपहास, उपरोध, नैराष्य, अगतिकता, धेयशुन्यता, भयानकता, विषमता, यंत्रामुळे येणारी विफल अवस्था प्रकट केली आहे. मुक्तिबोधंनी समूह समष्टीचे व्यापक आत्मभान आणि समष्टीची पीडा प्रकट केली आहे. पु.शि.रेगे यांनी सौंदर्यानुभूती शब्दात पकडणाऱ्या कविता लिहून मराठी कवितेचे स्थान निश्चित केले आहे. विंदा करंदीकर यांचे स्थान आधुनिक मराठी कवितेतील प्रयोगशील कवि म्हणून निश्चित झाले आहे. करंदीकर यांच्या कवितेतील सामाजिक जाणिवांची प्रधानता जाणिवानांच अनुसरुन येणारी प्रयोगशिलता, संवेदनगर्भता जीवनाचा शोध घेणारी चिंतनशिलता यामुळे त्यांची कविता अभिजात ठरते. मंगेश पाडगावकरांनी निसर्ग आणि भावसंवेदन एकरुप पावणारी कविता लिहिली. रेगेंनी मनोभूमिकेची बांधिलकी न स्वीकारता त्यांनी आपल्या कल्पना शक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिले. त्यामुळे त्यांची कविता विशुद्ध ठरते. या सर्व कविंच्या कवितेवर मर्ढेकरांचा प्रभाव पडलेला असला तरी सर्व कवींच काव्य हे नवकाव्याचे नव्हतें करंदीकर, बापट, पाडगावकर हे सर्व कवी भिन्न—भिन्न प्रवृत्तीचे होते.

मराठी दलित कवितेच्या प्रांतात दया पवार, वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळ, ज.वि.पवार, फ.मु.शिंदे, अर्जुन डांगळे, प्रज्ञा लोंखडे ज्योति लांजेवार, लोकनाथ यशवंत, भीमसेन देठे, सुखदेव ढाणके आदि कवींनी कवितेमध्ये मैलिक भर घातली. दलित कवित ही आंबेडकरी चळवळ गतिमान करणारी समाज परिवर्तनवादी अशी कविता आहे. १९६० नंतरच्या मराठी कवितेत फ.मु. शिंदे यांची कविता समकालीन कवितेच्या प्रवाहातील महत्त्वाची कविता आहे.

फ.मु.शिंदे यांची काव्यरचना :—

फ.मु.शिंदे यांची कविता दु:खानुभाव व उत्कट अभिव्यक्तिमुळे लक्षणीय ठरलेली आहे. दु:ख, अनुभव, वास्तव वर्तमान व्यवस्था आणि मानवी वृत्ती—विचार—भाव यांना प्रगट करण्यात यशस्वी झाली आहे. 'जुलूस', 'आदिम', 'वृंदगान', 'गाथा','सार्वमत', 'प्रार्थना', 'फकिराचे अभंग', 'आयुष्य वेचताना', 'मेणा', 'आई आणि इतर कविता', 'निरंतर', 'भूकंपाची मरणगाणी', 'सूर्यमुद्रा' इत्यादी कवितासंग्रह त्यांच्या नावावरती आहेत. त्यांच्या कविता आशयदृष्ट्या समृध्द आहेत. आत्मानुभाव, समाजानुभव, दु:खानुभाव यांना प्रकट करणारी ही कविता अनुभुतीच्या पातळी वर अस्सल असून स्वत:ची भूमिका स्पष्ट करणारी आहे. सामाजिक भान प्राप्त झालेली. चिंतनशिल वृत्तीची कविता असून, समाजातील वृत्ती—प्रवृत्तीवर प्रहार करत उपरोधाच्या अंगाने जाणारी व प्रतिमासौंदर्याचा अनोखा प्रत्यय देत चिंतन करणारी तसेच व्यक्तिसंवेदनेशी नाते सांगणारी कविता देखील त्यांनी लिहिली आहे.

फ.मु.शिंदे यांची कविता वास्तवाला स्पर्श करणारी, सांस्कृतिक मुल्य जपणारी, लोकशाही विचाराची आहे. त्यांच्या कवितेत मानवाला अमानुष करणाऱ्या प्रवृत्तींची चीड आढळते. शब्दांच्या अर्थापलिकडे जाऊन आशयाला उंची देण्याची क्षमता त्यांच्या रचनेत आहे. सतत परिवर्तनाचा प्रवाही मार्ग ते निवडतात. ''सहजता, स्वाभाविकता हा फ.मु. यांच्या व्यक्तिमनाचा अतिशय देखणा असा पैलू आहे. ही सहज स्वाभाविकता जशी वागण्या बोलण्यात आहे तशी लोखनातही एक प्रकारची सहजता आहे.''[घ] सहजतेने कविता लेखन करणाऱ्या शिंदेनी कवितेसाठी असणारी गांभिरता या वृत्तीचाही प्रत्यय दिला आहे. सूक्ष्म व जहाल उपरोध, अनेकार्थी रचना, सरळसोट धीट अभिव्यक्ति ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत.

फ.मु.शिंदे यांच्या कवितेतील उपरोध :—

फ.मु.शिंदे यांच्या कवितेमध्ये विविधता आढळते. सामाजिक आशयाची कविता लिहिणाऱ्या फ.मु. च्या कवितेत चिंतनशिलता समाजातील वृत्ती—प्रवृत्तीवर प्रहार, वृत्ती आणि वर्तनातील विसंगती शोधणारी कविता त्यांनी लिहिली आहे. लोकांच्या जगण्यातील विसंगतीचा वेध घेण्याच्या प्रयत्नामध्ये त्यांच्या कवितेतून उपरोधिकता परिणाम साधते. या उपरोधाला विषयाचे बंधन नाही. मुल्यांची होत असलेली पडझड उपरोधिकतेत अधिक आढळते कवि आपल्या कवितेतून जगातील वृत्ती आणि मनोवृत्ती यांचा विचार करतो. ते आपल्या कवितेतून बारकाव्यासह मांडतो. कवितेतील उपरोधिकता समाजातील व्यंग्याचा शोध घेत असते. समाजकारण, राजकारण, सत्ताकारण, धर्मकारण इत्यादी क्षेत्रातील प्रवृत्ती, विसंगती, रोजच्या घटना, शिक्षण व्यवस्था यातून उपहास, उपरोध, व्यंग, विनोंद, विडंबन आकार घेत असते.

फ.मु.शिंदे यांच्या 'दिल्ली ते दिल्ली', 'सार्वमत', 'फकिराचे अभंग', 'वृंदगान', 'आयुष्य वेचताना', 'निरंतर', 'गाथा, 'मनाचे अभंग' या कविता संग्रहातील कवितांमधून उपरोधिकता व्यक्त होतो सामाजिक ढोंग, व्यक्ति स्वभावामधील अतिरेकीपणा, विविध लकबी, पारंपरिक रुढी—विचारांमधील भोंगळपणा, नाटकीपणा, मुर्खपणा यावरील उपहास प्रामुख्याने दिसून येतो. उपहासपुरक परिस्थिती निर्माण झाल्यास ती कलावंताला अनुकुल असते. ''विसंगती नेमकी कशात आहे. हास्यास्पदता नेमकी कुठे दडलेली आहे, उपहासनीय व उपरोधनीय काय आहे, अत्युक्ती उनोक्ती यांची रुपे कुठे व कशी आहेत दंभ कुठे वास करतो आणि छंदफंद कुठे लपलेले आहेत यासारख्या सांस्कृतिक विंडबनकाराला आवश्यक असणाऱ्या बाबी.....या कालखंडात सैरभैर झालेल्या आहेत.''[ह्य] उपरोधिकतेचा विशेष असलेल्या कवितांमध्ये अल्पाक्षरत्वाचा वर आणि साधेसोपेपणा सरलता असली तरी उपहासप्रधान कवितेत वक्रता व स्फोटकता असते. फ.मु.शिंदे आपल्या कवितेत जगण्यातली विरुपता प्रखरपणे व्यक्त करतात. त्यांच्या कवितेतली उपरोधिकता एकांगी नाही मुल्यांचा ऱ्हास आणि बाजारीकरण यामुळे त्यांच्या कवितेला धार चढते. दुभंगलेले समाजवास्तव, स्वार्थांध राजकारण, तडजोडीचे गणित, धर्मलंपट मनोवृत्ती, अगतिकता, लाचारी या वृत्तींचा उपहास शिंदे यांच्या कवितेतून प्रखरपणे नोंदविला आहे.

फ.मु.शिंदे यांच्या कवितांमधून लोकशाहिराच्या गाभ्याचा संहार होत जाण ही अस्वस्थ करणारी गोष्ट शिंदे यांनी 'सार्वमत' कवितासंग्रहातील कवितामधून व्यक्त होते.

''हा देश माझा आहे
हे खोट नाही
दु:खही देशाहून
छोटं नाही
हा देश माणसांचा
हे खरं आहे
कत्तलखाने त्यात
हे बरं आहे.''[3]

मानवी मुल्य बदकारपणे पायदळी तुडवली गेली हे केवढ दुर्देव आहे. स्वातंत्र्यात हे घडावं याचच कवीला नवल वाटते. स्वातंत्र्याचा उपभोग घेतांना समानता न स्विकारण्याची वृत्ती डोके वर काढते 'फकिराचे अभंग' मध्येही स्वातंत्र्य आणि त्यातील उपरोध आला आहे.

''स्वातंत्र्याने दिले, मरण हातात
दुबळे गातात गवरुन''[४]
''लोकशाहीतही कण्हते धडगे
रिकामे गाडगे जगण्याचे''[5]

स्वातंत्र्यानंतरही जगणे फोल ठरवणारी लोकशाही यातून व्यक्त झाली आहे. मानवी अमानुषता शिंदे यांच्या कवितेतून व्यक्त होते. लोकशाहीतील विदारक रुपे पाहून कवी गंभीर होतो. त्याच्या कवितेला उपरोधाची धार चढते. मग तो उपरोध अत्याचारी मनोवृत्तीला सुचित करतो. अमानुष आत्याचारास खतपाणी घालणारी वृत्ती जेव्हा कौर्य धारण करते. अशा वेळी त्या वृत्तीने धारण केलेला बुरखा झाकला जात नाही हे सूचित करणारा उपरोध कवितेतून येतो.

''ठोठावून कवाडांना
उजेड दारी दावला
महात्म्यांनी घरोघर
एकेक टेंभा रोवला''[6]

स्वातंत्र्यात सगळीकडे दांभिकता, दंगली, संहार, कत्तली याबाबी बधीर बनवतात, अत्याचार परिसीमा गाठतात, मानवी स्वातंत्र्य धोक्यात येते. माणुसकीला काळिमा फासणारे वर्तन केले जाते, तेंव्हा कवि अस्वस्थ होतो. तो चिंतन करु लागतो. या प्रवृत्तीवर तो परखड भाष्य करतो.

'फकिराचे अभंग' या संग्रहातील कविता स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेली एकूण वास्तवातील दाहकता व्यक्त करणाऱ्या मार्मिक गुणवत्तेच्या कसोटीवर उतरणाऱ्या कविता आहेत. माणसाचे बळी घेणारी व्यवस्था कुणालाही अंतर्मुख करते. या व्यवस्थेतून येणारा उपरोध खऱ्या–खुऱ्या अर्थाने चिंतन करायला लावतो.

'' युगायुगांनी पुरले जगणे आमचे ,खोल
खडकास नाही तरी फुटली अजून ओल
थडग्यात इज्जतील कुठवर गप्प पुरावे
अंगावर आसवांचे का थोपवुन धरावे''[7]

एकंदर शिंदे यांच्या कवितेतून घडणारे वास्तव दर्शन आणि माणसाचे बळी घेणारी व्यवस्था यांचे भेदक चित्रण त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. समाजव्यवस्थेला केंद्रभागी ठेवून फ.मु.शिंदे यांच्या कवितेतून

अविष्कृत होणारी उपरोधिकता व्यवस्थेतील बारकावे टिपते. माणसेच माणसांच्या हिताच्या आड येतात. याबददल अचूक निदान करणारे भाष्य त्यांच्या कवितेतून आले आहे.

'दिल्ली ते दिल्ली' हा शिंदे यांची अल्पाक्षरी रचना प्रकारातील कवितासंग्रह यामधून राजकारणावरचा उपहास व्यक्त केला आहे. यामधून विसंगतीचे दर्शन घडवले आहे. उपहास, उपरोध, विडंबन आणि शब्दक्रिडा इत्यादिंचा विपूल उपयोग रचनेसाठी करुन घेतला आहे. मानवी वृत्तीमधील दांभिकपणा, अंतर्विरोध आणि माणसाच्या पाश्वीपणात होत गेलेली वाढ यावरील उपरोध प्रखडपणे व्यक्त करण्यात कवी यशस्वी झाला आहे. म्हणुनच ''पडगावकरांनी विनोदाशी केलेली शाब्दीक झटपट किंवा मर्ढेकरांच्या तुच्छता वादापेक्षा फ.मु.ची उपरोधिकता ही अंतर्मुख करणारी विचारकविता आहे''[+] हे डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मत चिंतनीय स्वरुपाचे आहे. 'सार्वमत' मधील कविता दाहक उपरोध आविष्कृत करतांना दिसते. माणसाच्या कुप्रवृत्तीचे दर्शन घडविणारी मानवी प्रवृत्तीच्या तळाशी जाऊन निरिक्षण करते तसेच लोकशाहीत लोकांच्या वृत्ती संदर्भात सामाजिक व सांस्कृतिक जगणे नष्ट होत चालले आहे. मानसिक व आर्थिक कुचंबना वाढत आहे. सर्वत्र दिसणारी मुल्यभ्रष्टता कवीने परिणामकारकपणे टिपली आहे.

समारोप :—

फ.मु. शिंदे यांच्या कवितांची दखल 'अस्मितादर्श' मधून गांगाधर पानतावणे यांनी घेतली आणि त्यांची कविता मराठी जगापुढे आली. 'जुलूस' मधील कवितांची दखल गंभीरपणे सगळीकडे घेतली गेली यातील कविता म्हणजे 'व्यथालय' आहेत असे म्हटले गेले. साठोत्तरी मराठी कवितेत शिंदे यांची कविता मराठी वाचकांशी नाते प्रस्थापीत करते. या कविता जाणिवांचे वेगळेपण घेउन जन्माला आल्या. समाज मनातील विकार, विचार, भाव यांचा तळ शोधणाऱ्या या कविता आहेत. मानव आणि मानवी संस्कृतीवर भाष्य करणाऱ्या सामाजिक जाणिवेच्या या कविता आहे. 'भकिराचे अभंग', 'गाथा','जुलूस' या कवितासंग्रहांमधील कविता उपहास, उपरोध व मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडवणाऱ्या आहेत.

फ.मु. शिंदे यांनी समाजातील वास्तवाचे भेदक दर्शन आपल्या कवितेतून घडविले आहे. उपरोधाच्या अंगाने आविष्कृत झालेल्या कवितेतून मौलिक विचारांबरोबरच उपरोध हे प्रधान सुत्र असल्याचे लक्षात येते. त्यांच्या कविता लोकशाही विचाराचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. मानवाला अमानुष करणाऱ्या प्रवृत्तींची चीड त्यांच्या कवितेतून व्यक्त झाली आहे. चिंतनशिलता, अनुभवांची प्रगल्भता, विविध विषयाची समृध्दता त्यांच्या कवितेला लाभल्यामुळे यांच्या कविता मराठी काव्यप्रांतात लक्षणीय ठरली आहे. फ.मु. शिंदे यांच्या कवितेचा उपरोधाच्या अंगाने अभ्यास करताना खालील प्रमाणे निष्कर्ष हाती आले आहेत.

निष्कर्ष:—

१) फ.मु.शिंदे यांची कविता स्वातंत्र्योत्तर जन्माला आलेली व स्वांतत्र्योत्तर काळातील संस्कृतीचे संदर्भ बदलणारी कविता आहे.

२) मानवी जीवनमुल्यांचा पुरस्कार करणारी शिंदे यांची कविता लोकशाही विचार व मार्ग यात आड येणाऱ्या वृत्तीचा निषेध नोंदवते.

३) सामाजिक जाणिवा आणि चिंतनशिलता हे त्यांच्या कवितेचे प्रधान सुत्र असल्याने मुलभूत व मौलिक विचार व्यक्त करण्यात ती कुठेही कमी पडत नाही.

४) समाजातील अनिष्ट प्रवृत्ती व लोकशाहीतील गैरवर्तन यावर ते प्रखर टीका करतात.

५) सामाजिक जाणिवा आविष्कृत करण्यात शिंदे यांची कविता सामाजिक बांधिलकी मानते.

६) फ.मु.शिंदे यांची कविता दु:खापासून सुरु होत, दु:खचा विस्तार करीत प्रगल्भ होते मग ते दु:ख व्यक्तिगत असो अथवा सामुहिक.

७) फ.मु.शिंदे यांची कविता समाजातील चांगुलपणाची पाठराखण करुन, अपप्रवृत्ती, ठोंग, अंधश्रध्दा यांचा उपरोधिक भाषेत समाचार घेते.

संदर्भ :—

१) वाडीकर भु.द. : 'मस्त फकीर' अक्षरप्रतिष्ठा, दिवाळी अंक, १९९८ पृ.क्र. १०४.
२) जाधव रा.ग. : 'फोडणी' (प्रस्तावना).
३) शिंदे फ.मु. : 'सार्वमत',पृष्ठ, ११.
४) शिंदे फ.मु. : 'फकिराचे अभंग', पृ.क्र. १.
५) तत्रैव : पृ.क्र. ३१.
६) शिंदे फ.मु. 'सार्वमत', पृ.कृ. २१.
७) शिंदे फ.मु. : 'गाथा' पृ.क्र. ५.
८) पानतावणे गंगाधर : 'फकिराच्या अभंगाचे पारायण', (चार शब्द फकिरासाठी) पृ.क्र.१४.

प्रा.डॉ. रामलीला सुदामराव पवार
मराठी विभाग प्रमुख , कला महाविद्यालय, तीर्थपुरी.

LBP PUBLICATION